सकाळ



साक्री : न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या सायबर सुरक्षा कार्यशाळेप्रसंगी उपस्थित विविध शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी.

# सायबर सुरक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

साक्री : येथे न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात क्वीक हिल फाउंडेशन, सायबर पोलिस विभाग, बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत सायबर सुरक्षासंदर्भात कार्यशाळा झाली. विद्यापीठाच्या कुनिका खैरनार, दर्शना हिरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत दीड हजार विद्यार्थ्यांनी सायबर व प्रातिनिधिक स्वरूपात अभिप्राय दिला. या वेळी प्रत्येकाने सायबर सुरक्षा शपथ घेऊन आपण व आपल्या परीजनांना सायबर धोक्यापासून बचावासाठी प्रयत्न करण्याच्या निर्धार व्यक्त केला. प्राचार्य पी. एस. सोनवणे, एस. बी. पाटील, कनिष्ठ महविद्यालयाच्या पी. एफ. शिवदे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, मुख्याध्यापिका सुनीता नाईक आदींनी संयोजन केले. कार्यशाळेत विद्यापीठाचे सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमाचे समन्वयक डॉ. राजू आमले यांचे मार्गदर्शन लाभले.

Dhule, Dhule-Today
24/10/2023 Page No. 3